नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०१/०२/२०२२ (मंगळवार)**

**(सायंकाळ)**

---

## जबर दुखापत

पो.स्टे. कळमेश्वर :- अंतर्गत २० कि.मी. अंतरावरील मौजा पारडी देशमुख येथे दिनांक २७/०१/२०२२ चे ११.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे- भालचंद्र वासुदेव भागवत वय ५९ वर्ष रा. पारडी देशमुख व आरोपी नामे- दिनेश धनराज नागपुरे रा. पारडी देशमुख हे एकाच गावात राहत असुन फिर्यादी हा गावातील चंदु अंतुलकर यांचे पानठेल्यावर खर्रा घेवुन घरी परत जात असता फिर्यादीला पाहुन आरोपीने म्हटले की, 'तु बायोकोच्या भरोश्यावर खाते आणि मजा मारते फुकटचा' असे म्हंटल्यावर त्याला फिर्यादीने हटकले असता आरोपीने फिर्यादी सोबत धक्काबुक्की केल्याने व फिर्यादी खाली पडल्याने त्यांना जमीनीवर असलेले गिट्टीचा मार लागल्याने त्यांचे उजवे हाताला मार लागुन ते जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार तभाने मो. नं. ८६००४५८६७८ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. भिवापुर :- अंतर्गत २० किमी. मौजा भगवानपूर येथे दिनांक २०/०१/२०२२ चे १०.०० वा. दरम्यान **श्रीमती वच्छलाबाई गुलाबराव भांभरकर(मृतक) वय ७५ वर्ष, रा. भगवानपुर ता.भिवापुर** ही आपले राहते घरी एकटीच हजर असतांना लाकडी पलंगाखाली कोळशाच्या शेगडीची आग लागुन चादरी जळुन तीचे डाव्या बाजुचे भागाला आग लागल्याने ती ३६ टक्के जळाली. तीला उपचाराकामी मेडीकल कॉलेज नागपुर येथे दि. २०/०१/२०२२ चे ०२.३१ वा. भरती केले असता उपचार दरम्यान डॉक्टरांनी तपासुन दि. २९/०१/२०२२ चे ०४.३० वा. मृत घोषीत केले. सदर मरणाबाबतचे कागदपत्र दि. ३१/०१/२०२२ रोजी प्राप्त झाल्याने सरदचा मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार विकास बेलसरे मेडीकल पोलिस बुथ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार नागेश वाघाडे मो.क्र. ८९७५५४२४४३हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर